Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

UGC Approved Monthly Journal

VOL-IV ISSUE-X Oct. 2017

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# भाषा शिक्षणातील नव्या पद्धती

**डॉ.सुनीता पुरुषोत्तम सांगोले**
दयानंद कला महाविद्यालय,
लातूर (महाराष्ट्र)

21 व्या शतकात भाषा शिक्षण क्षेत्रात दिवसेंदिवस प्रगती होताना दिसते. प्रत्येक क्षेत्रात माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा उपयोग होतोय. भाषाक्षेत्रातही तो होताना दिसतोय. भाषेच्या वापराचे क्षेत्र, भाषा वापरणारी व्यक्ती, भाषेच्या वापरामागचे प्रयोजन या दृष्टीने भाषा विकसित होणे गरजेचे आहे. भाषेचे व्यवहारातील उपयोजन विविधांगी स्वरुपाचे आहे. या उद्दिष्टांची पूर्तता होणारे भाषाशिक्षण आज गरजेचे आहे.

भाषा हा मानवी जीवनाचा अविभज्य भाग आहे. भाषेद्वारेच आपण बोलतो, रागावतो, प्रेम करतो, विनंती करतो, भाषण देतो..... उपयोगाची ही यादी आणखी खूप वाढवता येईल. प्रत्यक्ष संदेशन तर होतेच पण मनातल्या मनात विचार करणे, स्वप्नातसुद्धा माणूस भाषाच वापरत असतो. जागाची ओळख माणसाला भाषेच्या माध्यमातूनच होत असते आणि स्वतरूची ओळख सांगातानाही भाषेचे माध्यम तो वापरतो. माणूस समाजशील प्राणी आहे. माणसामाणसांमधील प्रत्यक्ष व्यवहारात, सामाजिक, सांस्कृतिक संदर्भात भाष कशी वापरली जाते हे जर आपण निरिक्षण केले तर त्यातील वैविध्य लक्षवेधक आहे.

व्यक्ती–व्यक्तीतील परस्परांतील नाते, काळ–वेळ–प्रसंग, विषय संदर्भ यावरुन भाषेची धाटणी ठरते. भाषा लवचिक आहे. मानव या भाषेला आपल्या उपयोजनानुसार (वाकवतो) वळवतो. भाषा ही माणसाचे सर्व जीवन व्यापून टाकणारी संस्था असल्यामुळे तिच्या अभ्यासाचे क्षेत्र फार व्यापक आहे. भाषेच्या अभ्यासाची काही एक परंपरा असली तरी गेल्या दोन अडीच शतकात भाषाभ्यासाने लक्षवेधक गती घेतली आहे. वर्णनात्मक, ऐतिहासिक, सामाजिक....... अशा विविधांगी दृष्टीकोनातून भाषेचा अभ्यास केला जातो. त्याचप्रमाणे भाषेचे व्यहारातील उपयोजन लक्षात घेऊन जो अभ्यास केला जातो त्यास उपयोजित भाषाविज्ञान म्हणतात. उपयोजित भाषाविज्ञानाच्या शाखेअंतर्गत भाषाशिक्षण व भाषाध्ययन संदर्भात विचार करायचा आहे. भाषावैज्ञानिक उपपत्तींनी भाषाशिक्षणाच्या क्षेत्रात नवव्यवस्था किंवा नव्या प्रणालींचा प्रारंभ केला आहे.

**भाषा शिक्षणविषयक** :

भाषा ही एक सामजिक संस्था आहे. सहयोग, सहकार्यासाठी परस्परविनिमयाचे साधन म्हणून भाषा महत्त्वाची आहे. अनुकरणाने मूल भाषा शिकते. आपापल्या बौद्धिक कौशल्याने गरजेनुरुप तो आपल्या भाषेचा विकास साधतो. सभोवतालची परिस्थिती आणि समाज यातून त्याची भाषिक जडण–घडण होते. भाषेद्वारे आत्मनिवेदन, आत्मप्रकटीकरण शक्य होते. भाषा म्हटले की, आपल्या डोळ्यासमोर येतो तो पुस्तकात छापलेला किंवा हाताने लिहिलेला मजकूर. त्यामुळे भाषेचा अभ्यास करायचा म्हणजे केवळ लिखित रुपाचा असे काही आपल्याला वाटते. वास्तविक लिहिण्यापेक्षाही बोलताना भाषेचा उपयोग अधिक आणि वैविध्यपूर्ण पहावयास मिळतो. त्यादृष्टीने भाषाशिक्षण व्हावयास हवे.

भाषाशिक्षणाबद्दल दुसरी एक गैरसमजूत म्हणजे साहित्यालाच किंवा साहित्याच्या अभ्यासालाच भाषाशिक्षण असे गृहित धरले जाते. भाषा हे साहित्याचे माध्यम आहे. साहित्याच्या वाचण्याने भाषा विकसित होण्यास सहाय्य मिळते. हे जरी खरे असले तरी केवळ ते म्हणजे भाषाशिक्षण नव्हे. हा गैरसमज होण्याचे कारण म्हणजे आपले विद्यालयीन व महाविद्यालयीन अभ्यासक्रम कारणीभूत आहेत. जीवनाच्या अनेक अंगांसाठी, व्यवहारासाठी आपण भाषेचा उपयोग करीत असतो. हे उपयोजन

करताना सगळीकडे सारखीच भाषा वापरणे उचित नव्हे. त्यासाठी कुठे, कोणती, कशी भाषा वापरावी याचे योग्य ज्ञान असेल तर भाषा उपयोजन प्रभावी होते. या दृष्टीनेही भाषा शिक्षण व्हावयास हवे.

**भाषाशिक्षणाची स्थिती–गती :**

कधी कधी मराठी काय आपली मातृभाषा आहे, तिच्यात काय शिकायचे ? ती तर मला चांगली येते. अशी बेफिकीरी या व्यवहारात दिसून येते. मातृभाषा मराठी शिक्षणाचे माध्यम मराठी, साहजिकच प्रथम भाषा म्हणून मराठीची निवड करुनही शालांत परीक्षेत मराठी विषयात प्रचंड प्रमाणात विद्यार्थी अनुत्तीर्ण होताना दिसतात. या मागची कारणे शोधून उपाय करायला पाहिजेत. खरे तर दहावी पर्यंत येणाऱ्या या विद्यार्थ्यांला मराठी भाषेचे पायाभूत ज्ञान झाले पाहिजे. प्रचलित नियम पाळून निर्दोष लेखन कसे आणि का करावे हे त्याला स्वतरूला समजले पाहिजे. भाषा सौंदर्य, लेखनातील रचनासौंदर्य त्याबरोबरच विचार सौंदर्य हे त्याला चांगल्या प्रकारे माहित झाले पाहिजे. भाषेची समज आली, भाषेचे संस्कार झाले तर पुढे कुठल्याही अभिव्यक्तीत तो कमी पडणार नाही. भाषा शिक्षणातून खालील भाषिक क्षमता विकसित व्हाव्यात अशी अपेक्षा असते.

**1. भाषेची जाण :**

माणसातल्या भाषिक व्यवहारामागे, वर्तनामागे अमूर्त असलेल्या नियमव्यवस्थेचे सहज ज्ञान म्हणजे भाषिक क्षमता होय. विद्यार्थ्यांचा शब्दसंग्रह, शब्दांचा नेमका अर्थ, अनेक अर्थ, शब्दांचा लक्षणेनुसार वाक्यात उपयेग करता येणे, वाक्प्रचार–म्हणी, अर्थछटा,...... या बाबींचे ज्ञान झाले पाहिजे. प्राथमिक ते माध्यमिक स्तरापर्यंत भाषेची एवढी जाण जर विद्यार्थ्यांत निर्माण झाली तर भाषाशिक्षण सफल होईल. पण दुर्दैवाने भाषाभ्यास म्हणजे साहित्याचा अभ्यास असेच समजून भाषा विषय शिकवला जातो. आणि मग विद्यार्थ्यांत भाषिक क्षमता बहुअंगांनी कशा विकसित होतील ?

**2. संज्ञापन क्षमता :**

भाषेची नियमव्यवस्था ज्ञात असणे व त्यांचा यथार्थ व यथोचित वापर करता येणे म्हणजे संज्ञापन क्षमता यासाठी विद्यार्थ्यांना कोठे? काय? कसे ? बोलावे हे कळले पाहिजे. शब्दांचा लक्षार्थ, व्यंगार्थ कळावा. समर्पक शब्दांचा, भाषेचा वापर त्याला करता यावा. एकूणच भाषिक उपयोजनाचे त्याचे कौशल्य विकसित व्हावे.

**3. भाषांतर क्षमता :**

भाषांतर क्षमता विकसित होण्यासाठी लक्ष्य भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक असते. वाक्यरचनेचे स्वरुप, शब्दांचे स्थान, शब्दांचा, म्हणींचा वाक्प्रचारांचा उचित वापर यांचे आकलन असावे. भाषेचा व्यंगार्थ, भावार्थ याचेही आकलन येथे अपेक्षित आहे.

**4. सर्जन क्षमता :**

विद्यार्थ्यांची सर्जनक्षमता आजमावण्यासाठी काही प्रयोग केले पाहिजेत. भाषा उपयोजनाचा सराव करुन घेतला पाहिजे. कारण कोणतेही कौशल्य सरावानेच प्राप्त होत असते. उदा. पाण्यासाठी शोध घेत फिरणारा चतुर कावळा, माठात तळाशी गेलेले पाणी, पिण्यासाठी माठात खडे टाकतो. या गोष्टीत बदल करुन एखाद्या विद्यार्थ्याने कावळा एक नळी शोधतो, तिच्या सहाय्याने पाणी ओढून शोषून पितो असे दाखविले तर त्याची सृजनशीलता. पारंपारिक कथेत थोडा सूचक बदल करुन चांगला नाट्यात्म परिणाम साधता येतो. हे कौशल्य विद्यार्थी शिकतो. निबंध लेखन, मुद्यावरुन गोष्ट तयार करणे, चित्राचे वर्णन करणे, यातून असे भाषिक कौशलय विकसित होते.

भाषेतल्या अनेक क्षमतांपैकी काही कौशल्ये विद्यार्थ्यांत दिसून येतात.पण काही अंगे दुर्लक्षितही पहावयास मिळतात. सर्जनक्षमता असून, संधी मिळूनही या क्षमतेचा पुरेसा वापर विद्यार्थी करताना दिसत नाहीत. कदाचित आपले भाषाविषयक अभ्यासक्रम, शिकवण्याची पद्धत, प्रयोगाचा अभाव, कौशल्याच्या सरावातील उणिवा यामुळे भाषिक उपयोजनात विद्यार्थी कमी पडतात.या बाबतीत आणखी एक विशेषत्त्वाने जाणवलेली बाब मोठी गंभीर आहे. अनेक चुकीच्या भाषिक सवयी विद्यार्थ्यांमध्ये दिसून येतात. जसे वाक्यरचनाविषयक अज्ञान किंवा वापराबाबत ढिलाई दिसून येते.

यासाठी भाषिक चुकांचे दिग्दर्शन करुन ते सुधारित रुपात वापरुन दाखवले गेले पाहिजे. साहित्याचे वाचन भाषिक उपयोजन शिकण्याच्या दृष्टीनेही व्हावे असे वाटते.

**1. प्राथमिक स्तर (1 ली ते 5 वी ) :**

भाषा हे दैनंदिन जीवनातील संवादाचे रुप आहे. याचा विसर न पडू देता भाषाशिक्षण दिले जावे. पूर्व प्राथमिक शाळेत जाण्याअगोदर मूल समाजाकडून भाषा शिकते, बोलते. हेच मूल जेंव्हा शाळेत जायला लागते. तेंव्हा घरात बोलण्याच्या बोलीत शाळेत बोलताना त्याला संकोच वाटू शकतो. शाळेत त्याला पुस्तकात शिरावे लागते. मुलांची भाषा व पुस्तकांतील भाषा ह्यात अधिक अंतर पडले तर मूल शिक्षणापासून दुरावते. खूपवेळा प्राथमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांबद्दल तक्रारीचा असा सूर लावला जातो की, *मूल घरी खूप बडबड करतं, पण शाळेत अजिबात बोलत नाही* याचे कारण स्व–भाषेविषयी निर्माण होणारा संकोच होय. गरजेनुरुप त्याला भाषिक बदल, भाषेचे उपयोजन क्रमाने विकसित केले तर ही प्रक्रिया सोपी होते. यासाठी अभ्यासक्रम काळानुरुप भाषा उपयोजनास सहाय्यभूत ठरणारा असावा.

या स्तरावर भाषाध्यापन करणाऱ्या शिक्षकाने प्रयोगशीलता दाखवावी. जसे मुलांशी त्यांच्या आवडीच्या विषयावर त्यांना जवळीक वाटेल अशा भाषेत बोलावे, यातून त्यांच्या मनातील उत्सुकता उफाळून येते. मुलांना चित्रे किंवा वस्तू दाखवून त्यांच्याशी गप्पा माराव्यातय असे प्रश्न विचारावेत ज्याची उत्तरे एका शब्दात, एका वाक्यात, हळू–हळू एका परिच्छेदात मुले देतील. यामुळे भाषेतील चढ–उतार, विरामचिन्हे, शुद्धता यांचा संस्कार मुलांवर होतो.

या भाषाशिक्षणाच्या प्रक्रियेत माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर करुन घेता येतो. जसे –
*स्वप्नात पाहिली राणीची बाग, हत्तीच्या पाठीवर बसलाय नाग*

या काव्यपंक्तितील वर्णन जर प्रत्यक्ष दिसले तर त्यातील गंम्मत अनुभवास येते, ते उच्चारही विद्यार्थी ऐकतात. स्वप्न झोपल्यावर पडते, बाग म्हणजे काय ? (झाडे,वेली,हिरवळ, पशु–पक्षी प्राणी...) यामुळे हिंस्रक काय, गरीब काय हे कळते. पाठी वर म्हणताना शब्दरचनेचे कौशल्य कळते.

आज मुलांना दूरदर्शनवर काही पाहणे दुरापास्त नाही. खेडोपाडी टी.व्ही.चे माध्यम जाऊन पोहंचले. त्यामुळे मुले दूरदर्शनवरील जाहिराती, गीते म्हणता म्हणता त्या भाषेचा सरावही होतो. चित्रफित पाहिल्यामुळे त्यांचे आकलनही वाढते. गोष्टीतील संवाद प्रत्यक्ष नाट्यात्मक पद्धतीने पाहिल्यामुळे भाषेचा कुठे ? कसा ? वापर करावा याचे नकळत ज्ञान त्याला मिळते.

जसे – *त्याला चूक उमगली (तो) आईच्या गळ्याला पडून म्हणाला, आई, नको ना रागावू, पुन्हा नाही करणार*

याऐवजी शाळेतील चुकीसाठी तो जेंव्हा गुरुजींसमोर हात जोडून उभा राहतो तेंव्हा, म्हणतो, ''गुरुजी मला माफ करा, मी परत अशी चूक करणार नाही.''

वरील विवेचन, संवादातून औपचारिक ठिकाणी करावयाचा भाषेचा वापर व अनौपचारिक ठिकाणी वापरावयाची भाषा याचे सहज संस्कार मुलांवर बिंबतात. भाषेतील नम्रता, लाडीवाळपणा हे गुणही त्याला जाणवतात. शिवाय शब्दांचे योग्य उच्चार, बोलण्यातील चढ–उतार, प्रश्न, आज्ञा देणारी भाषा याचेही ज्ञान त्याला होते.

**2. माध्यमिक स्तर ( 6 वी ते 10 वी ) :**

माध्यमिक स्तरावर विद्यार्थ्यांना स्व–भाषेबरोबर, द्वितीय भाषा व अनिवार्य भाषा अशा तीन भाषांचा परिचय होतो. येथे श्रवण, भाषण, वाचन, लेखन या क्रमाने भाषिक क्षमता विकसित व्हाव्यात.

**अ) श्रवण :**

विद्यार्थ्यांना चांगले योग्य उच्चार ऐकण्याची संधी मिळाली पाहिजे. वाक्य कसे उच्चारावे, उच्चारातून भावनांची अभिव्यक्ती कशी होते हे कळावे. कवितेची लय, तिला लाभलेला ताल याचा अनुभव कळावा. यासाठी प्रकट वाचन, ध्वनिफिती ऐकवणे, चित्रफितींचाही वापर झाला तर प्रभावी श्रवण होते.

**ब) भाषण–संभाषण :**

बोलण्याच्या सरावाला भाषा शिक्षणात महत्त्वाचे स्थान आहे. गोष्टी सांगणे, प्रश्नोत्तरे, मुलाखत, अनुभवकथन अशा उपक्रमांतून भाषण–संभाषणाचा सराव होतो. येथे प्रत्यक्ष ह्या कृती विद्यार्थ्यांकडून करुन घ्याव्यात यासाठी विद्यार्थ्याला आरशासमोर उभे राहून बोलण्याचा सराव करावयास सांगावे. तो बोलताना त्याचे चलत्चित्रण केले तर ती चित्रफित पाहून त्याला आपण बोलताना कसे दिसतो ? कुठे चुकतो ? ते कळेल. शिक्षकही ह्या चुका निदर्शनास आणून देऊ शकतात, बदल सूचवू शकतात.

**क) वाचन :**

वाचन मौन किंवा प्रकट दोन प्रकारांनी होऊ शकते. मौन वाचन करताना एकाग्रता साधून आकलन, आस्वादाचा परिघ रुंदावता येतो. प्रकट वाचनात उच्चार, विरामचिन्हांचा वापर त्याला कळू लागतो.

**ड) लेखन :**

साधारणपणे माध्यमिक स्तरावर अनुकरणातून लेखन,स्वलेखन, शुद्ध लेखन, समर्पक लेखन हा भाषिक विकास साधला जावा.

श्रवण योग्य असेल जर उच्चार कळतो. लेखनातही तंतोतंतपणा येतो. लेखनविषयक नियम पाळून तंतोतंत उच्चाराप्रमाणे केलेले लेखन त्याने वाचले तर आपोआप त्याचे लेखनही सुधारते. यासाठीही दृक–श्राव्य माध्यमाचा उपयोग करुन घेता येतो.

विद्यार्थ्यांना ऐकू येणारे कथन किंवा काव्य, शब्द त्याच्या अर्थछटा शिक्षकाने लक्षात आणून द्याव्यात. पण दृक–श्राव्य माध्यमाने या अर्थछटा सहजपणे त्याच्या त्यालाच जाणवतात. केवळ शब्दांचे लेखन नव्हे तर विचार, अनुभव, कल्पना लिहिताना त्याचे भाषेचे आकलन समृद्ध व्हावे तसा प्रत्यय देणारे लेखन व्हावे. यासाठीही पाठयपुस्तकाबाहेर जाऊन प्रत्यक्ष एखादा अनुभव त्याची अभिव्यक्ती दाखवणे प्रभावी ठरते.

**3. महाविद्यालयीन व विद्यापीठीय स्तर (11 वी 12 वी ते पदव्युत्तर) :**

आज आपण पाहतो महाविद्यालयीन स्तरावर येऊन पोहंचलेला विद्यार्थीही आत्मविश्वासाने भाषेचा अवलंब करीत नाही. तो व्यासपीठावर बोलण्याचे टाळतो. निबंध लेखन, किंवा कुठलेही अवांतर लेखनही तो फारसा करत नाही. काही वेळा तर आपली अभिव्यक्ती व्यक्त करतानाही पुरेसे भाषिक सामर्थ्य त्याच्याकडे दिसत नाही. याचे कारण भाषा वापरासंबंधी प्रचंड उदासिनता घरी–बाहेर दिसून येते. मराठी शिकून कुठे काही नोकऱ्या लागणार नाहीत असे म्हणत मुलांना भाषिक दृष्ट्या सक्षम करण्याकडे पूर्णतः दुर्लक्ष होताना दिसते. खरे तर शिक्षणात ज्ञान घेताना असो किंवा मांडताना, मग ते कुठल्याही विषयाचे असो. माध्यम भाषाच लागते ना ? मग हे माध्यमच अपुरे पडत असेल तर विद्यार्थ्यांची प्रगती कशी होईल. याचा विचार सामान्यतः पालकांनाच नव्हे तर शिक्षकांनाही पडताना दिसत नाही.

आज भाषेकडे पाहण्याचा दृष्टिकोन व्यापक हवा. भाषा एक विषय, एक माध्यम, भाषेकडून साहित्याकडे व साहित्याकडून भाषेकडे, संपर्कासाठी भाषा, मातृभाषा, द्वितीय भाषा, तृतीय भाषा, सत्ता आणि प्रशासनाची भाषा, कार्यालयीन भाषा, व्यापार भाषा, भाषांतरे..... या व्यापक परिप्रेक्ष्यातून भाषेचा विचार करणे गरजेचे आहे.

भाषेच्या बाबतीतील महाविद्यालयीन विद्यापीठीय स्तरावरील दृष्टीकोन काळानुरुप बदलायला हवा. भाषाशिक्षणातून मिळणाऱ्या करिअर(आयस्त्रोत)च्या संधीकडे लक्ष वेधावे लागेल. या अभ्यासक्रमांची पुनर्रचना करुन हे अभ्यासक्रम नोकरी मिळविण्यास पूरक कसे होतील, हेही पहावे लागेल. काही विद्यापीठांतून तसे प्रयत्न होत आहेत. उपयोजित मराठी, व्यावहारिक मराठी, प्रसारमाध्यमांची भाषा या दृष्टीने भाषेचे अभ्यासक्रम होत आहेत, ही स्वागतार्ह बाब होय.

**मराठी भाषा कौशल्यातून उपलब्ध होणारे आयस्त्रोत :**

भाषिक क्षमता असणाऱ्या व्यक्ती भाषेचा प्रभावी उपयोग करु शकतात. आपले ज्ञान, मते, विचार मांडताना भाषा हेच माध्यम प्रभावी ठरते. या दृष्टीने अनेक संधी देखील भाषेवर प्रभुत्त्व असणाऱ्या व्यक्तींना लाभत असतात.

**1. प्रसारमाध्यमाच्या क्षेत्रात :**

वृत्तलेखन, वाचन, जाहिरात लेखन, मुलाखत घेणे, निवेदन, अभिनय करणे...... अशा अनेक संधी उपलब्ध आहेत. यासाठी भाषेचा लवचिक उपयोग करुन घेता आला पाहिजे. येथे लेखन व संप्रेषण दोन्ही कौशल्यांना वाव आहे.

**2. चित्रपट क्षेत्रात :**

आज चित्रपट क्षेत्रात लेखक, पटकथा लेखक, संवाद लेखक, गीतकार......अशा क्षेत्रात (प्रतिष्ठा व पैसा दोन्ही भरपूर मिळकत असलेल्या क्षेत्रात) भाषिक कौशल्य असणाऱ्या कलावंतांना खूप मोठ्या संधी आहेत. अभ्यासक्रमात पटकथालेखन संवादलेखन, काव्य लेखन यांना स्थान हवे. या क्षेत्रात ज्यांनी ठसा उमटविला अशा चित्रपटांचे, चांगल्या नाटकाचे प्रयोग, ध्वनिफितीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दाखवता येतात. या संबंधी कार्यशाळा आयोजित करुनही विद्यार्थ्यांना नव्या दिशा दाखवता येतात. अभ्यासक्रमात प्रात्यक्षिकासह असे विषय नेमले तर विद्यार्थ्यांना निश्चितच त्याचा उपयोग होईल.

**3. भाषांतर क्षेत्र :**

भाषांतर कौशल्यासाठी स्वभाषेशिवाय आणखी एखादी भाषा शिकावी लागते. अनुवाद मग शब्दशरू असो किंवा भावानुवाद हे कौशल्य प्राप्त असेल तर शासनाच्या विविध कार्यालयातून दुभाषी लागत असतात. शिवाय भाषांतराचा स्वतंत्र व्यवसायही पैसा, प्रतिष्ठा मिळवून देणारा आहे.

**4. सूत्रसंचलन :**

सूत्रसंचलन हा देखील अलिकडे चांगला व्यवसाय गती घेतोय. समर्पक, सूचक, हजरजबाबी बोलण्याच्या शैलीमुळे सूत्रसंचालन प्रभावी करता येते. भाषिक कौशल्ये प्राप्त व्यक्तीच या व्यवसायात उभा राहू शकतो.

**5. विविध कंपन्यांमध्ये :**

स्वागतिकेमध्ये किंवा जनसंपर्कासाठी भाषिक कौशल्य असणाऱ्या व्यक्तींची निवड केली जाते.

**6. संशोधन संकलनात :**

भाषा व साहित्य विषयक संशोधनासाठी आज खूप मोठा वाव आहे. या क्षेत्रात हवी तेवढी मजल गाठता येऊ शकते. आज पारिभाषिक शब्द, कोश वाङ्मय समृद्ध होण्याची गरज आहे. त्यासाठी संशोधन संकलन व्हावे. हे केवळ भाषा व साहित्याच्या विकासासाठीच नव्हे तर एकूणच मानवी विकासासाठीसुद्धा गरजेचे आहे. यासाठी भाषिक क्षमता असलेले लोक लागतात.

**अभ्यासक्रमांची पुनर्रचना :**

वरील करिअरच्या संधी लक्षात घेता अभ्यासक्रमाची पुनर्रचना होणे आवश्यक आहे. ती काळाची गरज आहे. भाषेचे अध्ययन, अध्यापन कृतिप्रधान व आनंददायी करण्याच्या हेतूने प्राथमिक स्तरावर अंकतक्ते किंवा अक्षरतक्ते यांचा वापर केला जात असे. वस्तू–प्राणी यांचया चित्रांच्या सहाय्याने परिचय करुन दिला जातो. आज तंत्रज्ञान विकसित झाले. प्रत्यक्ष पडद्यावर चित्र व ते ते शब्द दाखवले जाऊ शकतात. त्याबरोबरच प्राण्यांचे हुबेहुब ओरडणे वा आवाजही मुलांच्या कानावर पडतो. दृक–श्राव्य माध्यमामुळे ज्ञान अधिक प्रभावीपणे मुलांपर्यंत पोहंचते त्याची परिणामकारकता वाढते. भाषाविषयक विविध संबोध, कल्पना, संकल्पना आणि प्रक्रिया विद्यार्थ्यांना स्पष्ट होण्यासाठी व त्यांचे सुलभतेने आकलन व्हावे यासाठी परिसरातून तो अनुभव द्यायचा कधी चित्रफित दाखवून, कधी ध्वनीफितद्वारे परिणामकारकपणे हे ज्ञान पोहंचवता येते

प्रसिद्ध मानस शास्त्रज्ञ डॉ. एडगर डेल, त्यांनी डोळा, कान, त्वचा, नाक, जीभ ह्या ज्ञानेंद्रियामार्फत विद्यार्थी ज्ञान कसे व किती प्रमाणात प्राप्त करता याची आकडेवारी दिली आहे. त्यामध्ये त्यांनी असा उल्लेख केला आहे की, ऐंशी टक्के ज्ञान विद्यार्थी डोळ्यांमार्फत प्राप्त करतात. म्हणून अध्यापक समृद्ध होण्यासाठी शब्दप्रतिके, आकाशवाणी, ध्वनिफीती, चलतचित्रे, सहली, प्रदर्शने, प्रात्यक्षिके, नाट्यीकरण, अशा तंत्रांनी, साधनांनी विद्यार्थ्यांच्या आकलन क्षमतेचा परीघ रुंदावता येतो.

पदवी व पदव्युत्तर स्तरावरील अभ्यासक्रमात आजवर वाङ्मयीन अभ्यासालाच प्राधान्य दिले गेलेले दिसून येते. आज प्रसारमाध्यमे, टी. व्ही., जाहिरात, पत्रकारिता, पटकथालेखन, कार्यक्रमसंहिता लेखन, सूत्रसंचलन, मुलाखत अशा नव्याने उपलब्ध झालेल्या व्यावसायिक क्षेत्रांमुळे मराठी किंवा कोणत्याही भाषिक कुशलतेला, सक्षमतेला मोठा वाव आहे. यासाठी भाषेचे केवळ चौकटीतले नव्हे तर चौफेर संभाषणास, संज्ञापनास उपयुक्त भाषिक कौशल्ये आत्मसात करण्याची आवश्यकता असते.

आज केवळ एकाच भाषेचे नव्हे तर त्याबरोबर इतर एखाद्या भाषेस आत्मसात केले किंवा बहुभाषिक असाल तर पर्यटनक्षेत्रातही संधीची उपलब्धता आहे. एकूणच मराठी भाषेचाच नव्हे तर भाषा किंवा कलाशाखेच्या अभ्यासक्रमाची व्यावसायिक पात्रतेच्या दृष्टीकोनातून पुनर्मांडणी होणे गरजेचे आहे. तरच हा अभ्यासक्रम या तरुण पिढीला आत्मविश्वासाने करिअरकडे वाटचाल करण्यास सहाय्यभूत ठरेल.

अभ्यासक्रमातील बदलाबरोबरच अध्यापनक्षेत्रातही बदल अपेक्षित आहे. वरील व्यावसियक पात्रतांसाठी जी भाषिक कौशल्ये अभिप्रेत आहेत. ती आत्मसात होण्यासठी माहिती–संप्रेषण तंत्रज्ञानाशिवाय पर्याय नाही. यासाठी महाविद्यालयीन स्तरावर भाषा प्रयोग शाळा असावी, अध्यापनात दृक–श्राव्य माध्यमांचा(पॉवर पाईंट प्रझेंटेशन) उपयोग असावा. चित्रफिती दाखविणे, ध्वनीमुद्रणे ऐकवणे, चित्रपट दाखवणे या बरोबरच रेकॉर्डीग करणे, टेप, ऑडिओ, व्हिडीओ, सी.डी. संगणक, माहितीचे आंतरजाल (इंटरनेट) या माध्यमातून प्रगत भाषिक कौशल्ये प्रभावीपणे आत्मसात करता येतात.

मराठी भाषेसंबंधात अनेकदा भाषा टिकेल का नाही, तिचा ऱ्हास होत चालला असा सूर आळवला जातो. पण भाषा अशी एकदम नष्ट होत नसते. परिवर्तने होत असतात. संक्रमणेही होत असतात. मराठी भाषेला जी पूर्वपरंपरा लाभलेली आहे ती नष्ट होऊ द्यायची नसेल तर आधुनिक तंत्रज्ञान, उपयुक्त व्यवहारी अभ्यासक्रम, नव्या नव्या संधींना सामोरे जाऊन भाषेची क्षमता वाढवणे, भाषेला ज्ञानभाषा म्हणून समर्थ करणे, तिचा कस वाढवणे ही काळाची गरज ओळखून मराठी भाषा शिकविणे, बदल स्वीकारणे हे उज्ज्वल भवितव्याची नांदी होय.

हल्ली सुशिक्षित होणे म्हणजे बहुभाषक असणे हे गृहित धरले जाते. काळाचे पाऊल ओळखून मातृभाषेबरोबर अन्य भाषाही आत्मसात करता याव्यात. अशा अभ्यासक्रमांची मांडणी होणे गरजेचे आहे. अभ्यासक्रमाबरोबरच भाषा शिकविणारे शिक्षकही उपक्रमशील, सृजनशीलतेला वाव देणारे, आधुनिक माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा, इंटरनेट (महाजाल) चा वापर करणारे असावेत. या नवपद्धतींनी विद्यार्थ्यांची भाषाविषयक जाणीव सूक्ष्म, सखोल,सुजाण होईल. भाषिक कौशल्ये त्यांना प्रगतीच्या वाटेवर सहाय्यभूत ठरतील. एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करताना भाषा शिक्षणातील परिवर्तनाच्या दिशेने आपण उचललेले पाऊल निश्चितच आशादायक ठरेल यात शंका नाही !